महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीच्या योजनांची नियमावली निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. सिंसाअ ७२१५ (१४) / प्र.क्र. २३१ /सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ एप्रिल, २०१६

**संदर्भ** :- शासन निर्णय क्र. ओएफएल-१०८२/सीआर-९/८२/अल्पसंख्यांक कक्ष/सा.प्र.वि.
दि. २४ जानेवारी, १९८२

**प्रस्तावना :-**

सिंधी साहित्याच्या सर्वांगीण उन्नतीसाठी व विकासासाठी महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीची संदर्भाधीन शासन निर्णयान्वये स्थापना करण्यात आली आहे. या अकादमीमार्फत सिंधी भाषेच्या उन्नतीसाठी विविध योजना कार्यान्वित करण्यासंदर्भात मार्गदर्शक नियमावली तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयान्वये सिंधी साहित्य अकादमीमार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे नियमावली निश्चित करण्यात येत आहे.

**(अ) - पुरस्कार योजना**

१. **उद्दिष्ट :-** सिंधी साहित्य क्षेत्रात मोलाचे कार्य व भरीव योगदान देणा-या साहित्यिकांना तसेच प्रतिवर्षी उत्कृष्ट सिंधी वाड्.मय निर्मितीकरिता लेखकांना उत्तेजन देण्यासाठी पुरस्कार देऊन सन्मानित करणे, हे या पुरस्काराचे उद्दिष्ट आहे.

२. **पुरस्काराचे स्वरुप :-**

| अ. क्र. | पुरस्काराचे नांव | पुरस्काराची संख्या | पुरस्काराची रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | अखिल भारतीय जीवन गौरव सन्मान पुरस्कार | १ | १,००,०००/- |
| २. | सिंधी साहित्य क्षेत्रातील पुस्तक / ग्रंथांना साहित्य /वाड्.मय पुरस्कार | ४ (प्रत्येकी रु. ५०,०००/-) | २,००,०००/- |
| ३. | पत्रकारिता पुरस्कार | १ | २५,०००/- |
| ४. | अनुवाद पुरस्कार | १ | २५,०००/- |
| ५. | काव्य पुरस्कार | १ | २५,०००/- |
| ६. | नवोदित साहित्यिक पुरस्कार | १ | २५,०००/- |

सर्व पुरस्कार्थींना रोख रक्कमेसह शाल, श्रीफळ, मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात येईल.

**३. पुरस्काराचे क्षेत्र :-**

१. **<u>अखिल भारतीय जीवन गौरव सन्मान पुरस्कार :-</u>** सिंधी साहित्य क्षेत्रात प्रदीर्घ काळ मोलाचे योगदान देणा-या व त्यासाठी आपले आयुष्य वेचलेल्या साहित्यिकांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाईल.

२. **<u>सिंधी भाषेतील पुस्तक/ग्रंथांना साहित्य/वाड्.मय पुरस्कार :-</u>** काव्य, उपन्यास, कहाणी, निबंध, समिक्षा, अनुवाद, विज्ञान कथा व सिंधी भाषेतील लेखन या क्षेत्रात प्रकाशित करण्यात आलेल्या सिंधी साहित्यातील मागील ३ वर्षातील (जानेवारी ते डिसेंबर) पुस्तकांची निवड या पुरस्कारासाठी करण्यात येईल.

३. **<u>पत्रकारिता पुरस्कार :-</u>** सिंधी भाषेतून पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-यास दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येईल.

४. **<u>अनुवाद पुरस्कार :-</u>** मराठी भाषेतून सिंधी भाषेत व सिंधी भाषेतून मराठी भाषेत पुस्तकांचा अनुवाद करणा-या साहित्यिकास हा पुरस्कार दरवर्षी दिला जाईल. मागील ३ वर्षातील (जानेवारी ते डिसेंबर हा कालावधी) पुस्तकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल.

५. **<u>काव्य पुरस्कार :-</u>** काव्य या क्षेत्रात उल्लेखनीय साहित्य रचना करणा-यास हा पुरस्कार दरवर्षी दिला जाईल. मागील ३ वर्षातील (जानेवारी ते डिसेंबर हा कालावधी) पुस्तकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल.

६. **<u>नवोदित साहित्य पुरस्कार :-</u>** उत्कृष्ट सिंधी वाड्.मय / साहित्य निर्मितीसाठी साहित्यिकांना प्रोत्साहन देण्याकरिता नव्याने पुस्तक प्रकाशित करणा-या नवोदित साहित्यिकास हा पुरस्कार देण्यात येईल.

**<u>४. पुरस्कारासाठीची पात्रता :-</u>**

**१. जीवन गौरव पुरस्कार :-**

१ उत्तमोत्तम सिंधी साहित्याची निर्मिती करणारा लेखक / साहित्यिक या पुरस्कारासाठी पात्र राहील.

२ पुरस्कार्थीचे सिंधी साहित्य क्षेत्रातील कर्तृत्व / जेष्ठत्व सिध्द असावे.

३ पुरस्कार्थीचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.

४ हा पुरस्कार दरवर्षी दिला जाईल.

**२. साहित्य / वाड्.मय पुरस्कार :-**

१ पुरस्कार्थीचे सिंधी साहित्य क्षेत्रातील कर्तृत्व वादातीत असावे. मागील ३ वर्षातील त्यांचे ग्रंथ / पुस्तक प्रसिध्द असावे.

२ पुरस्कार्थीचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.

**३. पत्रकारिता पुरस्कार :-**

१) पुरस्कार्थी किमान ५ वर्षे पत्रकारिता या क्षेत्रात कार्यरत असावा.

२) पुरस्कार्थीचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.

**४. अनुवाद पुरस्कार :-**

१ पुरस्कार्थीने यापूर्वी किमान दोन पुस्तकाचे अनुवाद केलेले असावे.

२ पुरस्कार्थीचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.

**५. काव्य पुरस्कार :-**

१ पुरस्कार्थीने यापूर्वी किमान दोन पुस्तकाचे अनुवाद केलेले असावे.

२ पुरस्कार्थीचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.

**६. नवोदित साहित्यिक पुरस्कार :-** पुरस्कार्थीचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.

**५) समिती :-** सिंधी साहित्य अकादमीचे कामकाज पाहण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या समितीमार्फत अथवा सदर समितीने पुरस्कारासाठी गठीत केलेल्या उपसमितीमार्फत पुरस्कार्थीची निवड करण्यात येईल. पुरस्कारासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन शिफारशी मागविण्यात येतील व प्राप्त शिफारशी तसेच समिती सदस्यांच्या शिफारशीनुसार अंतिम निर्णय घेण्यात येईल. मुख्य समिती अन्य कार्यक्रम / योजनांसाठी आवश्यक त्या उपसमित्या नेमू शकेल.

**६) पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंबंधीची नियमावली :-**

१) जीवन गौरव पुरस्कार हा दरवर्षी एका व्यक्तीस दिला जाईल.

२) ज्या साहित्यिकास ज्या क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त झाला आहे, त्या साहित्यिकास पुढील २ वर्षे त्याच क्षेत्रातील पुरस्कारासाठी अर्ज करता येणार नाही. परंतु दुस-या साहित्य क्षेत्रासाठी अर्ज करता येईल.

३) साहित्यिकास एकाचवेळी वेगवेगळया साहित्य क्षेत्रांतर्गत पुरस्कारासाठी अर्ज करता येईल. मात्र त्यास एका वर्षी केवळ त्याच्या एकाच क्षेत्रातील पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येईल.

४) साहित्यिक स्वत: अथवा संस्थेमार्फत, प्रकाशकामार्फत किंवा मान्यवर व्यक्तीमार्फत प्राप्त झालेल्या अर्जाचादेखील पुरस्कारासाठी विचार करता येईल.

५) डी.लीट, पीएचडी, एम.फिल यासारख्या शिक्षणासाठी संबधित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने शोधप्रबंध, संपादित संकलन तसेच तत्सम इतर ग्रंथाचा पुरस्कारासाठी विचार करता येणार नाही.

६) पुरस्कारासाठी राज्यस्तरीय व मान्यताप्राप्त वृत्तपत्रातून जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात येतील.

७) पुरस्कारप्राप्त मान्यवर तसेच पुरस्कारासाठी निमंत्रित प्रमुख अतिथी (जास्तीत-जास्त २) त्याचप्रमाणे सिंधी अकादमी सदस्य यांचे पुरस्कार प्रदान सोहळयाच्या वेळेस निवासाची व्यवस्था करण्यात येईल.

८) पुरस्कारप्राप्त मान्यवर, सिंधी अकादमीचे सदस्य तसेच पुरस्कारासाठी बोलाविण्यात आलेले अतिथी यांना पुरस्कार प्रदान सोहळयाच्यावेळी कार्यक्रमस्थळी येण्यासाठी वातानुकुलित तृतीयश्रेणीच्या रेल्वेच्या तिकिटाच्या दराइतकी रक्कम अदा करण्यात येईल.

**७) पुरस्कार योजनेचे वेळापत्रक :-**

१) प्रतिवर्षी वृत्तपत्रामध्ये एप्रिल महिन्यात जाहिरात देण्यात येईल.

२) प्राप्त शिफारशी तसेच पुस्तकांची छाननी करण्याची कार्यवाही जून अखेरपर्यंत पूर्ण करण्यात यावी.

३) अकादमीच्या समितीची बैठक घेऊन पुरस्कार्थीची निवड प्रक्रिया जुलैअखेरपर्यंत पूर्ण करुन त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

४) प्रतिवर्षी दि. १० एप्रिल सिंधी भाषा दिनी किंवा समिती निश्चित करेल त्या तारखेस पुरस्कार प्रदान सोहळयाचे आयोजन करण्यात येईल.

**(ब) <u>पुस्तकाच्या प्रकाशनाकरिता अनुदान योजना :-</u>**

१) **<u>उद्दिष्ट :-</u>** सिंधी भाषेतील साहित्यिकांना उत्तेजन देण्यासाठी तसेच त्यांना सर्जनशील वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सदर योजना सुरु करण्यात येत आहे.

**२) <u>योजनेचे स्वरुप :-</u>**

१ प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस म्हणजेच एप्रिल महिन्यात वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन साहित्यकृती मागविण्यात येईल.

२ साहित्यिकांनी अकादमीकडे संपूर्ण तपशिल आवेदन पत्रासह साहित्यकृतीच्या सुवाच्च अक्षरात २ हस्तलिखित प्रती देण्यात याव्यात.

३ साहित्यिकांनी आवेदनपत्रासोबत सदर पुस्तकाच्या प्रकाशनास येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक जोडावे.

४ सदर साहित्यकृतीची छाननी अकादमीमार्फत गठीत करण्यात आलेल्या उपसमित्यांमार्फत करण्यात येईल. समितीने सदर छाननी सर्वसाधारणपणे प्रत्येक आर्थिक वर्षी जून/जुलै या महिन्यात करावी.

५ साहित्यकृती अनुदानासाठी पात्र ठरल्यानंतर सदर साहित्यकृतीच्या प्रकाशनाची व्यवस्था लेखकास स्वत: करावी लागेल. अथवा प्रकाशक संस्थेकडून करुन घ्यावी लागेल. प्रकाशनासाठी लागणारा कालावधी प्रकाशन संस्थेकडून प्रमाणित करुन घेऊन त्याची प्रत अनुदान मंजूरीच्या पत्रासोबत जोडणे आवश्यक असेल.

६ साहित्यकृतीच्या प्रकाशनाला अनुदान दिल्यानंतर अनुदान मंजूरीच्या पत्रात प्रकाशनासाठी नमूद केलेल्या कालमर्यादेतच सदर पुस्तक प्रकाशित करणे आवश्यक असेल.

७ साहित्यकृती प्रकाशित झाल्यानंतर त्याच्या २५ प्रती विनामुल्य अकादमीस देणे बंधनकारक राहील.

८ साहित्यकृतीचे प्रकाशन करताना त्याच्या पहिल्या पानावर खालील मजकूर सिंधी भाषेत प्रकाशित करणे आवश्यक आहे.

| |
|---|
| **हे पुस्तक महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीच्या पुस्तक प्रकाशन अनुदान योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानाच्या सहयोगातून प्रकाशित करण्यात येत आहे.** |

९ एखाद्या साहित्यिकाच्या / लेखकाच्या साहित्यकृतीस एकदा अनुदान दिल्यानंतर पुढील ५ वर्षे त्या लेखकास प्रकाशनासाठी अनुदान देता येणार नाही.

१० आवेदन पत्रातील माहिती खोटी असल्यास किंवा योजनेच्या अटी/शर्तीचे भंग झाल्याचे आढळल्यास मंजूर केलेले अनुदान रद्द करण्यात येईल, आणि जर अनुदान दिले असेल तर ते व्याजासहीत परत घेतले जाईल. आवश्यकता भासल्यास कायदेशीर उपाय-योजना केली जाईल.

११ या योजनेअंतर्गत अनुदानाची मागणी अमान्य करताना कोणतेही कारण दिले जाणार नाही.

**<u>३) अनुदानाचे स्वरुप :-</u>** ज्या साहित्यकृती समितीमार्फत प्रकाशित करण्यासाठी पात्र ठरविण्यात येतील, त्या साहित्यकृतीच्या प्रकाशनासाठी साहित्यिकांनी जोडलेल्या अंदाजपत्रकातील खर्चाची ५०% रक्कम अथवा रु.२०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम अनुदान म्हणून मंजूर करण्यात येईल.

**<u>४) योजनेसाठीची पात्रता :-</u>**

१ महाराष्ट्रात १५ वर्षे सलग वास्तव्य करणारे सिंधी साहित्यिक (१५ वर्षाचा वास्तव्याचा पुरावा म्हणून अधिवास प्रमाणपत्र सादर करावे लागेल)

२ महाराष्ट्रात १५ वर्षापेक्षा अधिक काळ वास्तव्य असलेल्या स्थानिक लेखकाच्या अप्रकाशित किंवा प्रकाशनाधीन पुस्तकाच्या प्रकाशनाकरिता दरवर्षी एका पुस्तकास अनुदान देण्यात येईल.

३ शासनाच्या या योजनेअंतर्गत एकदा लाभ घेतलेल्या साहित्यिकास यापुढील ५ वर्षापर्यंत या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

४ या योजनेअंतर्गत प्रकाशित होणा-या पुस्तकाला कोणत्याही खाजगी संस्था, राज्य शासन अथवा केंद्र शासनाचे कोणतेही अनुदान घेता येणार नाही.

५ सदर अनुदान हे मूळ साहित्यकृतीलाच मिळेल. अनुदानित किंवा संपादित पुस्तकाच्या प्रकाशनास हे अनुदान मिळणार नाही.

६ साहित्यकृतीच्या प्रथम आवृत्तीच्या प्रकाशनासच अनुदान मिळेल. पुनर्मुद्रण अथवा नंतरच्या आवृत्तीच्या प्रकाशनासाठी हे अनुदान मिळणार नाही.

७ साहित्य क्षेत्रातील पुढील वाड्.मय प्रकार या योजनेअंतर्गत पात्र राहतील.
कविता, नवलकथा, लघुकथा, नाटय/एकांकिका, ललित आणि बालसाहित्य.

**५) समिती :-** प्राप्त साहित्यकृतींना अनुदान देण्यासंदर्भात पात्र ठरविण्यासाठी अकादमीमार्फत तज्ञ व्यक्तींची एक समिती गठीत करण्यात येईल. सदर समितीमार्फत साहित्यकृतीची छाननी करुन अनुदान देण्यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्यात येईल. साहित्यकृतीच्या प्रकाशनासाठी पात्र / अपात्रतेसंदर्भात समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील. या विषयावर कोणताही वाद व चर्चा होऊ शकणार नाही. तसेच हस्तलिखिते परत मिळणार नाही.

**<u>टीप :-</u>** एखाद्या लेखकाच्या साहित्यकृतीचे महत्व जाणून या योजनेच्या अटी / शर्तीमध्ये

शिथीलता देऊन सदर साहित्यकृतीच्या प्रकाशनासाठी अनुदान देण्याचे अधिकार सिंधी साहित्य अकादमीच्या मा. अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या कार्यकारी समितीच्या बैठकीस राहील.

## (क) ग्रंथालय अनुदान योजना.

१) **उद्दिष्टे :-** सिंधी भाषेची उन्नती करण्यासाठी सिंधी पुस्तकाच्या लिखाण वा वाचनाची आवश्यकता आहे. सिंधी पुस्तकाच्या माध्यमातूनच सिंधी साहित्याचा प्रचार व प्रसार होणार असल्यामुळे या बाबीस प्रोत्साहन देण्यासाठी ग्रंथालयांना सिंधी पुस्तके खरेदी करण्यासाठी अनुदान देता येईल.

२) **योजनेचे स्वरुप :-**

१ एप्रिल महिन्यात वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन ग्रंथालयाकडून सिंधी भाषेतील पुस्तके विकत घेण्यासाठी पुस्तकांची यादी मागविण्यात येईल.

२ पुस्तकाची यादी सादर करतांना त्यामध्ये पुस्तकाचे नांव, लेखकाचे नांव, साहित्य प्रकार, प्रकाशन संस्थेचे नांव, प्रकाशन वर्ष व पुस्तकाची किंमत इ.बाबतचे विवरणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३ सदर अनुदान हे ग्रंथालयांना सिंधी भाषेतील पुस्तके विकत घेण्यासाठी मिळेल.

४ ग्रंथालयांनी या अनुदानाचा उपयोग कार्यालयीन खर्च उदा. फर्निचर, वेतन, व्यवस्थापकीय खर्च तसेच ग्रंथालयीन कामकाज यासाठी करता येणार नाही. ग्रंथालयांना पुस्तकांसाठी अनुदान देताना त्यामध्ये नवलकथा, कविता, नाटक, निंबध, ललितकथा, विवेचन, चिंतन, साहित्यिक संपादन इ. वाङ्.मय प्रकाराचा समावेश असावा. परंतु साहित्येतर पुस्तके उदा. पाककृती, वैद्यकीय अथवा शालेय अभ्यासक्रम, उद्योगधंदे वैगरेचा समावेश असलेल्या पुस्तकांच्या खरेदीस अनुदान देता येणार नाही.

५ अनुदानातून विकत घेण्यात आलेल्या पुस्तकाच्या पहिल्या व शेवटच्या पानावर सिंधी भाषेमध्ये खालील मजकूर असलेला रबरस्टँप मारलेला असावा.

| |
|---|
| **हे पुस्तक महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमी यांचेकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून विकत घेण्यात आले आहे.** |

६ ज्या ग्रंथालयांना पुस्तक खरेदीसाठी अनुदान मिळाले आहे, अशा संस्थांनी पुस्तक विकत घेतल्यानंतर पुस्तकाच्या देयकाच्या झेरॉक्सप्रती सनदी लेखापालाच्या सहीशिक्क्यानिशी अकादमीस सादर केल्यानंतरच सदर ग्रंथालयास पुढील वर्षी अनुदानाची मागणी करता येईल.

७ ग्रंथालयांना अनुदान देण्यासंदर्भातील अकादमीचा निर्णय अंतिम राहील.

८ या योजनेअंतर्गत अनुदानाची मागणी अमान्य करताना कोणतेही कारण दिले जाणार नाही.

९ जो पुस्तक विक्रेता अकादमीस १०% किंवा त्यापेक्षा जास्तीची सवलत व घरपोच पुस्तके पुरविल, अशांचाच अकादमीच्या बैठकीत प्राधान्याने विचार करुन कळविण्यात येईल.

३) **अनुदानाचे स्वरुप :-** प्रत्येक वर्षी रु.२०,०००/- ते २५,०००/- पर्यंतच्या मूळ किंमतीच्या पुस्तकाच्या खरेदीसाठी अनुदान मंजूर करता येईल.

४) **योजनेची पात्रता :-**

१ नोंदणीकृत संस्थेद्वारे चालविण्यात येणा-या मोफत ग्रंथालयासच या योजनेचा लाभ मिळू शकेल.

२ खाजगी अथवा व्यावसायिक तत्वावर चालविण्यात येणारी ग्रंथालये या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र ठरणार नाही.

## (ड) सिंधी अकादमीमार्फत आयोजित कार्यक्रमाबाबतची नियमावली.

१) **लोकसाहित्य व सांस्कृतिक कार्यक्रम :-** महाराष्ट्रात ज्या शहरांमध्ये सिंधी समाजाची मोठया प्रमाणात वस्ती आहे, अशा शहरांमध्ये सिंधी लोकसाहित्य, सिंधी संस्कृती, सिंधी भाषा व त्यातील गीते यापैकी एक अथवा अनेक प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करता येईल. प्रत्येक वर्षी ४ शहरांची अकादमीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये निवड करण्यात येईल व तेथे लोकसाहित्य, चर्चासत्रे व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. प्रत्येक कार्यक्रमासाठी रु.२.०० लाख इतक्या मर्यादेपर्यंत खर्च करण्यात येईल. त्यामुळे या प्रयोजनासाठी एकूण रु.८.०० लाख इतका खर्च करण्यात येईल. अकादमींच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत शहरांची नांवे अंतिम झाल्यानंतर खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासनाची मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

२) **प्रूफरिडींग व शुध्दलेखन कार्यशाळा :-** सिंधी भाषा शुध्द स्वरुपामध्ये लिहिता-वाचता यावी, या उद्देशाने अकादमीमार्फत दरवर्षी प्रूफरिडींग व शुध्दलेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अकादमी साहित्य क्षेत्राशी संबंधित नोंदणीकृत संस्थेच्या सहाय्याने कार्यक्रमाचे आयोजन करील. नोंदणीकृत संस्थेची निवड ही अकादमीच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने करण्यात यावी. यासाठी कमाल रु.१.०० लाख इतका खर्च करण्यात यावा व या बाबतच्या खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करावे.

३) **कवी संमेलन :-** सिंधी भाषक किंवा सिंधी भाषेत काव्यलेखन करणा-या कवीचे अकादमीची समिती निश्चित करेल, त्या दिनांकास कवीसंमेलन आयोजित करण्यात येईल. नवोदित कवींना त्यातून प्रोत्साहन मिळून त्यांच्याकडून उत्कृष्ठ काव्यनिर्मिती होऊ शकेल.

४) **<u>सिंधी भाषा दिन व पुरस्कार प्रदान सोहळा</u> :-** दि. १० एप्रिल हा सिंधी भाषा दिन दरवर्षी साजरा केला जाईल. या प्रसंगी सिंधी भाषेतील विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जातील. या प्रसंगी किंवा समिती निश्चित करेल त्या दिनांकास जीवन गौरव व अन्य पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

५) **<u>सिंधी अकादमीचा अभ्यास दौरा</u> :-** ज्या राज्यांमध्ये सिंधी अकादमी आहे, त्यांचे कामकाज व उपक्रम पाहून आपल्या अकादमीसाठी त्याचा कसा उपयोग होऊ शकेल, याचा आढावा घेण्यासाठी अकादमीच्या ४ ते ५ समिती सदस्यांचा समावेश असलेल्या अभ्यास गटास त्या राज्यामध्ये दौ-याचे आयोजन करता येईल. तथापि, यासाठी शासनाची पूर्व संमत्ती घेणे आवश्यक राहील.

सिंधी साहित्य अकादमीच्या कार्यक्रमाच्या आयोजनाचा खर्च मागणी क्र. झेडडी-२, २२०५, कला व संस्कृती, (०९) सिंधी अकादमी, (०९) (०१) सिंधी अकादमीची आस्थापना, (२२०५ १६९७) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षातून त्या त्या वर्षी मंजूर असलेल्या तरतुदीतून भागविण्यात येईल.

हा शासन निर्णय प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या आदेशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४०२१५३९३०१२२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Louis Jacky Sequeira

Digitally signed by Louis Jacky Sequeira
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400051, st=Maharashtra, cn=Louis Jacky Sequeira
Date: 2016.04.02 15:39:06 +05'30'

**( लु. जा. सिक्वेरा )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) तथा अध्यक्ष, सिंधी साहित्य अकादमी यांचे खाजगी सचिव
२) मा. कार्याध्यक्ष, सिंधी साहित्य अकादमी यांचे स्वीय सहाय्यक
३) सर्व मा. सदस्य, सिंधी साहित्य अकादमी (सहसंचालक, सिंधी साहित्य अकादमी यांचेमार्फत)
४) प्रधान सचिव (प. व सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक
५) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई

६) सहसंचालक, सिंधी साहित्य अकादमी, मुंबई
७) महालेखापाल (महाराष्ट्र-१) (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
११) अवर सचिव, (अर्थसं) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) निवड नस्ती, सां.का.४

**महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीमार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्कार रकमेत वाढ करण्यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२४/प्र.क्र.२५६/सां.का.४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २४ सप्टेंबर, २०२४**

**वाचा :** शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. सिंसाअ ७२१५ (१४)/ प्र.क्र.२३१/सां.का.४, दिनांक ०१ एप्रिल, २०१६.

**प्रस्तावना :-**

सिंधी भाषेच्या प्रसार-प्रचारासाठी तसेच, सिंधी साहित्याच्या सर्वांगीण उन्नती व विकासासाठी महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमी स्थापन करण्यात आलेली आहे. विभागाच्या उपर्निर्दिष्ट शासन निर्णयान्वये सिंधी साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. पुरस्कार रक्कम निश्चित करण्याचा साधारणत: ०८ वर्षाचा कालावधी लक्षात घेता सदर पुरस्कार रकमेत दुपटीने वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सिंधी साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. अकादमीमार्फत देण्यात येणाऱ्या खालील पुरस्कारांच्या रकमेत दुपटीने वाढ करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | पुरस्काराची रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १ | अखिल भारतीय जीवन गौरव सन्मान पुरस्कार | २,००,००० |
| २ | सिंधी साहित्य क्षेत्रातील पुस्तक/ग्रंथांना साहित्य/वाड्:मय पुरस्कार - ४ (प्रत्येकी रु.५०,०००) | ४,००,०००<br>(४ x १,००,०००) |
| ३ | पत्रकारीता पुरस्कार | ५०,००० |
| ४ | अनुवाद पुरस्कार | ५०,००० |
| ५ | काव्य पुरस्कार | ५०,००० |
| ६ | नवोदित साहित्य पुरस्कार | ५०,००० |

०२. सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपर्निर्दिष्ट दिनांक ०१ एप्रिल, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व बाबी यथास्थिती लागू राहतील. तसेच, सदर शासन निर्णय ज्या दिनांकास निर्गमित होईल त्या दिनांकापासून सदरचा निर्णय अंमलात येईल.

०३. या प्रित्यर्थ होणारा खर्च लेखाशीर्ष मागणी क्र. झेडडी-२, २२०५, कला व संस्कृती, (००), १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन, (०९) सिंधी साहित्य अकादमी, (०९) (०१) सिंधी अकादमीची आस्थापना (कार्यक्रम), (२२०५ १६९७) ०५ बक्षिसे या लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षाच्या अर्थसंकल्पित निधीतून भागविण्यात यावा.

०४. सदर खर्च वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनिमय, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

०५. यासाठी सहसंचालक, महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमी, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०६. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२४/ प्र.क्र.८०/ अर्थ-३, दिनांक २५ जुलै, २०२४ मधील सर्व परिच्छेद व परिशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी सहसंचालक, महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमी, मुंबई यांची राहील.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४०९२४११००७३३८४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( गोपिचंद पांडुरंग चव्हाण )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई.
४. सहसंचालक, महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमी, मुंबई
५. निवड समितीचे सर्व अशासकीय सदस्य (सहसंचालक, महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमी यांचे मार्फत)
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
८. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र, नागपूर
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र, नागपूर
१३. कक्ष अधिकारी (अर्थसं.), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१४. निवड नस्ती, सां.का.४